सरकारी लेख्यात रोखीचे व्यवहार पूर्ण रुपयात करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक-टीआरडब्ल्यू १३८२/प्र.क्र.३९८/कोषागारे-४
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १.४.१९८७

CR1987040101

## परिपत्रक

लेखांकन पध्दती व सरकारी व्यवहारात होणाऱ्या जमा खर्चाच्या व्यवस्थेत सुलभीकरण करण्याच्या उद्देशाने नेमलेल्या गीताकृष्णन समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन केंद्र सरकारने सरकारी देव घेवीचे व्यवहार पूर्ण रुपयात [५० पैसे व त्यावरील भाग पुढील पूर्ण रुपयात करण्यात यावा तर ५० पैशांखालील भाग दुर्लक्षित करण्यात यावा] करण्याचा निर्णय घेतला आहे.

२. सरकारी देवघेवीची व्याप्ती, परिणाम आणि विविधता लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र शासन खालील आदेश देत आहे :-

अ] सरकारी देवघेवीचे व्यवहार करताना ५० पैसे व त्यावरील भाग पूर्ण रुपयांत वसूल करण्यात यावा व ५० पैशाखालील भाग दुर्लक्षित करण्यात यावा.

ब] विभागीय रोकड वहीत दाखविण्यात येणारी देव-घेव, सर्व प्रकारच्या सरकारी देव-घेवी, मग त्यात प्रत्यक्ष जमा/खर्चाचा अंतर्भाव असो किंवा पुस्तकी समायोजन असो, पूर्ण रुपयात करण्यात यावे.

क] कार्यालय प्रमुखाकडे असलेल्या स्थायी रोकड अग्रधनामधून स्थानिकरित्या खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंचे किरकोळ रोकडीत प्रदान केल्यावर [आवश्यक असल्यास] अग्रधनाची पुन:पूर्ति करण्यासाठी उप प्रमाणके जोडून अधिदान व लेखा कार्यालयाकडे ठराविक काळाने भरपाई देयके सादर करण्यात यावीत. पुरवठादारांना देण्यात येणाऱ्या रकमा प्रत्येक वेळी शक्यतो नजीकच्या रुपयाच्या पूर्णांकात करण्यास सहकार्य करण्याबाबत त्यांचे मन वळविण्यात यावे. जेथे पैशाचे प्रदान टाळता येण्याजोगे नाही अशा अपवादात्मक प्रकरणात भरपाईसाठी करण्यात आलेल्या उप प्रमाणकांच्या, एकूण रकमेत पैशांचाही समावेश असेल. असे असले तरीसुध्दा भरपाई देयके अधिदान व लेखा कार्यालयाला पूर्ण रुपयाच्या आकारातच सादर करण्यात यावीत. मात्र शिलकेचे व्यवहार दाखवताना आहरण व संवितरण अधिकारी मुख्य रोकड वही तसेच किरकोळ रोकड वहीत-[अ] स्थायी अग्रिमाची भरपाई म्हणून प्रत्यक्षात मिळालेली रक्कम दर्शवितील.

क्रमाप...

एच-३२[१०,०००]-४-८७

ब] "व्यवहार पूर्णांकीत करणे." या सदराखाली भरपाई न झालेल्या पैशांची नोंद करतील, आणि

क] नंतर करावयाच्या भरपाई देयकात, ज्या देयकाव्दारे कमी रक्कम मिळाली होती, त्याबाबतचा तपशील देऊन ती रक्कम पुढे नेण्यात यावी. विशदीकरणात्मक उदाहरण म्हणून परिशिष्ट "अ" आणि "ब" माहितीसाठी सोबत जोडली आहेत.

ड] रद्दी कागद किंवा जुनी वर्तमानपत्रे, नियत कालिके, निकामी ठरलेले उपस्कर, वगैरे यांच्या विक्रीतून वसूल झालेली रक्कम नजीकच्या रूपयाच्या पूर्णांकीत करावी. ज्यांना एकेरी पावती दिली जाते अशा कोणत्याही पक्षाबरोबर करण्यात आलेल्या व्यवहारात पैशांचा समावेश करण्यात येऊ नये, म्हणजे अशा रकमा सरकारी लेख्यात फक्त पूर्ण रूपयांतच जमा केल्या जातील.

३. कर्मचा-यांना दिलेल्या कर्ज/अग्रिमावर टक्केवारीने आकारण्यात येणारे व हप्त्यांनी वसूल करण्यात येणारे व्याज, आता पूर्ण रूपयात वसूल केले जाईल. डाक-तार सारख्या विभागात जिथे काउंटरवर वस्तु विकल्या जातात, तिथे रोकड वही पूर्ण रूपयात केल्यामुळे आता तेथे हिशेब ठेवण्यात अडचण येणार नाही. डाक आयुर्विमा/अनुज्ञाप्ति फी/कर वगैरे बाबत वेतन देयकातून करण्यात येणा-या सर्व "आंतर स्तंभीय वजाती" नजीकच्या रूपयात पूर्णांकित करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता/महागाई भत्ता/प्रवास भत्ता, वेतन, रजावेतन इत्यादि रूपात कर्मचा-यांना देय असलेल्या हक्काच्या सर्व रकमा पूर्ण रूपयात करण्यात याव्यात. देयकांच्या "आंतर स्तंभा"मध्ये घेतल्या जाणा-या सर्व नोंदीसहीत सर्व पुस्तकी देव-घेवी पूर्ण रूपयात करण्यात येतील. अधिदान व लेखा अधिकारी/बँका यांचेकडून धनादेश/चलन या माध्यमातून होणारी देवघेव फक्त पूर्ण रूपयातच करण्यात येईल. विज मंडळ/महामंडळ अशा उपयुक्त संस्थांनी आपले शासनाकडून येणे असलेले दावे पूर्ण रूपयात करावेत. तसेच त्यांनी ग्राहकांची बिलेसुध्दा पूर्ण रूपयात परिवर्तीत करावी. राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली येणा-या सर्व स्थानिक संस्थांनी आपले करांचे दावे, जकात वगैरे अशा प्रकारे पुनर्गठीत करावेत जेणेकरून ते पूर्ण रूपयात येतील. लोकसेवा आयोगासारख्या संस्थांनी, ज्या, परीक्षा फीच्या रूपात महसूल गोळा करतात अशा संस्थांनी परीक्षा फी पूर्ण रूपयात कराव्यात. विक्रीकर, जमीन महसूल, शासनाचे अन्यकर, शासनाकडून तसेच जिल्हा परिषदा अन्य स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादिकडून देण्यात येणारी कर्जे व त्यावरील व्याज तसेच शासनाच्या विविध योजनांखाली देण्यात येणारी अर्थ सहाय्य इत्यादि. यांच्या वसूल करावयाच्या रकमा जरी अपूर्ण रूपयात येत असल्या तरी देखील त्यांची प्रत्यक्ष वसूल करावयाची व शासनात जमा करावयाची रक्कम उपरोक्त आदेशानुसार पूर्ण रूपयांतच आकारून भरणा करण्यात यावी.

४. वरील निर्णयांच्या परिणामस्वरूप सर्व मंत्रालयीन विभागांना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्याकडील नियमात/विधेयकात काही बदल आवश्यक आहेत किंवा काय याचा आढावा घेऊन आवश्यकता भासल्यास संबंधित नियम/विधेयकात योग्य ते बदल/सुधारणा करण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

..३..

५. वरील आदेश दिनांक १ एप्रिल १९८७ पासून अंमलात येत आहेत.

६. सर्व मंत्रालयीन विभागांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या माहितीसाठी उपरोक्त सूचना नजरेस आणाव्यात. तसेच मंत्रालयीन विभागांना अशीही विनंती करण्यात येते की वरील आदेशाचे अनुषंगाने आता सर्व व्यवहार रुपयाच्या पूर्णांकात होणार असल्यामुळे आपणाकडील संबंधित विधेयकांत/नियमांत आवश्यक ते बदल/सुधारणा करण्यात याव्यात.

७. महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, मधील संबंधीत नियमात आवश्यक ते बदल/दुरूस्ती यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

व. अ. पंडित
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता]१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल, [लेखापरीक्षा]१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]२, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल [लेखापरीक्षा]२, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल [वाणिज्यिक लेखापरीक्षा]महाराष्ट्र, मुंबई
सह सचिव, भारत सरकार, वित्त मंत्रालय [व्यय विभाग]नवी दिल्ली यांना त्यांचे क्र. एफ २३[८] इ-आयआय [ए]८६, दि. २६ जून १९८६ चे पत्राचे संदर्भात
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई
x प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा]मुंबई
x प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा]मुंबई
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
x प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
x सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई

..४..

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
उप संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर/नाशिक/पुणे/औरंगाबाद
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उपकोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कोषागार-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

x पत्राने

------

एच-३२[१०,०००]-४-८७

H-3

H-32(10,

## PETTY CASH BOOK

**ANNEXURE-'A'**

| RECEIPTS | | | | PAYMENTS | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount Received | Date | Sub-Voucher No. / Cheque No. | Particulars | Amount paid | Conveyance | Postage and Stamps | Misc. | Remarks |
| 500 | 1-4-1986 | Voucher No.1 | Permanent Cash Imprest | | | | | |
| | 2-4-1986 | Voucher No.2 | Conveyance | 15.20 | 15.20 | | | |
| | 2-4-1986 | Voucher No.3 | Purchase of Stationery | 25.80 | | | 25.80 | |
| | 2-4-1986 | Voucher No.4 | Conveyance | 20.70 | 20.70 | | | |
| | | | Total: | 61.70 | 35.90 | | 25.80 | |
| | | | Cash in hand c/o | 438.30 | | | | |
| 500 | | | Total at the end of the day | 500.00 | | | | |
| 438.30 | | | Balance b/d (Cash in hand) | | | | | |
| 61.00 | 10-4-1986 | Bill No.10 | Recoupment of permanent Cash Imprest | | | | | |
| 499.30 | | | Cash in hand c/o | 499.30 | | | | |
| | | | Total at the end of the day | 499.30 | | | | 0.70 unre-couped amount |

32(10,000-4-87)

H-32(10,000-4-87)

Annexure-'A' - contd.

| RECEIPTS | | | PAYMENTS | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount Rece-ived | Date | Sub-Voucher No. Cheque No. | Particulars | Amount paid | Conve-yance | Postage and Stamps | Misc. | Remarks |
| 499.30 | | | Balance B/d (Cash in hand) | | | | | 0.70 un-recouped amount. |
| | 15-4-86 | Voucher No.20 | Conveyance | 16.25 | 16.25 | | | |
| | 15-4-86 | Voucher No.25 | Local purchase of Gum bottles | 18.05 | | | 18.05 | |
| | | | Total :- | 34.30 | 16.25 | | 18.05 | |
| *35.00 | 15-4-86 | Bill No.26 | Recoupment of Permanent Cash Imprest. | | | | | *Includes Rs.0.70 on account of Bill No.10 re-couped vide Bill No.26 |
| | | | Cash in hand | 500.00 | | | | |
| 534.30 | | | Total at the end of the day | 534.30 | | | | |

ANNEXURE-'B'

CASH BOOK

[See (GAR 3) See Rule 13(1) of GGA (R&P) Rules, 1983]

Office ______________________ Month of ______________________

| RECEIPTS | | | | | | | | | | | PAYMENTS | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Particulars | | | | Contingencies | | | | | | | | | | Contingencies | | | | |
| Date | No. of the receipt issued or bill drawn | From whom received | Cheque/DD No. or Serial Nos. in the register of valuable | Receipt to be credited to Government Account. | Salaries and Advances. | In Recoupment of permanent Advances. | Advance payment (Personnel Cash Imprest) | Miscellaneous | Total | Classification | Date | Sub-vouchers Nos/Sr. No.(s) in the register of valuables | To whom paid or sent to PAO/Bank for crediting | Receipts to be credited to Government Account. | Salaries and Advances | Out of permanent advance | Out of money drawn in anticipation of payments | Miscellaneous | Total | Classification |
| | | | | Rs.P | Rs.P. | Rs.P. | Rs.P. | Rs.P. | Rs.P. | | | | | Rs.P. | Rs.P. | Rs.P. | Rs.P | Rs.P. | Rs.P. | |
| 1-4-1986 | 1 | PAO | | | | | 500.00 | | 500.00 | Permanent Adv. | 2-4-1986 | 2, 3 and 4 | | | | 61.70 | | | 61.70 | Office Expenses & Misc. |
| | | | | | | | | Closing Balance c/d | | | | | | | | 438.30 | | | 438.30 | |
| | | | | | | | 500.00 | | 500.00 Total | | | | | | | 500.00 | | | 500.00 | |

H-32(10,000-4-87)

ANNEXURE 'B'

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Balance b/d | | | | 438.30 | 438.30 | | | | | |
| | 10 | PAO | 61.00 | | 61.00 | | | | | |
| | | | 61.00 | 438.00 | 499.30 | Balance c/d | | | 499.30 | 499.30 |
| | | | | | | Difference of 0.70 is on account of unrecouped amount of Permanent Advance. | | | | |
| Balance b/d | | | | 438.30 | 499.30 | | | | | |
| | | | | | | | 15-4-1986 | 20 & 25 | 34.30 | 34.30 |
| 15-4-1986 | 26 | PAO | 35.00 | *35.00 | *35.00 | Closing balance c/d | | | 500.00 | 500.00 |
| | | | | 534.30 | 534.30 | Total | | | 534.30 | 534.30 |
| | | | | | | *Includes 0.70 recouped now. | | | | |

H-32(10,000-4-87)